# प्रतिक्षा

जुने मित्र/ मैत्रिणींसोबतच्या निखळ आठवणी फार मौल्यवान असतात, आयुष्यात कधीही मधेच अगदी क्षणभर जरी त्यांची आठवण आली तरी चेहऱ्यावर नकळत हास्य उमटते, जसे आपण एखादे रसरशीत चटणी लावलेले पान खातो, छान मजा घेतो, पान संपते, पण नंतर मध्येच दातांच्या मागून एखादा पानाचा तुकडा चटणी सकट परत जिभेवर येतो, पुन्हा संपूर्ण पान खाल्याचा आनंद देऊन जातो, तोही संपतो, मग त्या आशेने जिभेने आपण पुन्हा एखादा तुकडा राहिलाय का चाचपतो, अगदी तसेच या आठवणी आपल्याला प्रफुल्लित ठेवतात, जुन्या आठवणी, आपली मित्र मंडळी प्रत्येकाने जपली पाहिजेत...बघा एकदा परत संपर्क करून, असाच एखादा आठवणींचा तुकडा संपूर्ण क्षण उजळून देईल...

स. पु.

www.saarthbodh.com

सचिन पुरुषोत्तम कुलकर्णी